# परीक्षा केंद्रावर विशेषत: महिला उमेदवारांसाठी महत्वाची सुचना.

टिप - उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वतःची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे.

**उमेदवाराने आपल्या सोबत नवीनतम फोटो चिकटवलेले हे प्रवेशपत्र आणि सद्यास्थितीत वैध असे मूळ स्वरूपातील ओळखपत्र आणावे. प्रवेशपत्रावर असणारे नाव (ऑनलाईन नोंदणीच्यावेळी जे उमेदवाराने दिलेले असेल) ओळखपत्रावरील नमूद असलेल्या नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नाव बदलले आहे त्यांनी हयाची खास दखल घ्यावी. जर प्रवेश पत्रावरील फोटो/नाव आणि ओळखपत्रावरील फोटोत/नावात कोणताही फरक/विसंगती असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल, अशा उमेदवारांनी मूळ राजपत्रित अधिसूचना/मूळ विवाह प्रमाणपत्र प्रस्तुत केले तरच त्यांना परीक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल. ज्या महिला उमेदवारांच्या नावात विवाहानंतर बदल झाला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.** परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

**रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही.**
**उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्रात दिलेल्या सुचनांची प्रिंट काढावे व काळजीपुर्वक वाचन करावे.**

दिनांक:- ०५.०६.२०२४
ठिकाण:- नागपूर

स्वाक्षरी/-
**(सौम्या शर्मा,**भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नागपूर